परवानगी वर्ष : २००५ - २००६
माध्यम : इंग्रजी
**कायम विना अनुदान**

जा.क्र.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२००६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :- 16 SEP 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात एका वर्षासाठी प्रथम मान्यता .....
पुणे पोलिस पब्लिक स्कुल, शिवाजीनगर, पुणे ५

संदर्भ :- १. आपले पत्र क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./३२७/०६ दिनांक १४/१/२००६
२. शा.प.क्रं. नमाशा-२००५/(३०८/२००५)/माशि-१ दिनांक २८/६/२००५
३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य ३/(१४)नमाशा/मान्यता/पुवि/२००६ दिनांक २२/५/२००६

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये पुणे सिटीझन्स पोलिस फाउंडेशन, मॉडेल कॉलनी, पुणे १६ या संस्थेच्या पुणे पोलिस पब्लिक स्कुल, शिवाजीनगर, पुणे ५ या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता आठवी** च्या वर्गास २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षासाठी **जून २००५** पासून एका वर्षासाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुना घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडुन मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७.
१८. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर सदरची अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात एका वर्षासाठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

COLOUR XEROX

**स्वाक्षरीवर वि. व. वं. धोंडे**
**सही आहे.**

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १. मुख्याध्यापक,
पुणे पोलिस पब्लिक स्कुल, शिवाजीनगर, पुणे ५

२. निवडनस्ती

Priyadarshani Pune Police Public School * Pune-5 *

ASDixit
**Principal**
**Priyadarshani Pune Police Public School**
**Primary / Secondary**
**Police Headquarters**
**Shivajinagar, Pune - 411 005.**

Scanned with CamScanner